


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड अंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ११ जानेवारी २०२५ | अंक३३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## महायुतीची टाळी वाजणार?



महाराष्ट्राच्या राजकारणात कधीही काहीही होऊ शकतं. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांमधील घडामोडींनी तर तेच दाखवून दिलं आहे. विशेष म्हणजे राज्यात महायुतीचं सरकार असलं तरीही आता विरोधातील दोन पक्ष हे महायुतीत सहभागी होऊ शकतात का? अशी चर्चा आता रंगली आहे. कारण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात दोन मतप्रवाह असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यातील एका गटाचं सत्तेत थेट सहभागी व्हावं, असं म्हणणं आहे. तर दुस-या गटाचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आपला पक्ष विलीन करुन सत्तेत सहभागी व्हावं, असं म्हणणं आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. इथे तशा घडामोडी सुरु असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषदेत राजकारणात काहीही होऊ शकतं, असं म्हटलं आहे. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या याच वक्तव्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीवेळी केलेलं एक वक्तव्य चर्चेला कारण ठरत आहे.देवेंद्र फडणवीस यांना एका मुलाखतीत रॅपिड फायर फॉर्मेटमध्ये प्रश्न विचारण्यात आला की, राज ठाकरे की उद्धव ठाकरे? त्यावर ते आधी हसले आणि नंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे हे मित्र झाले आहेत आणि उद्धव ठाकरे हे शत्रू नाहीत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. ङ्गमगाशी मी सांगितलं की, राजकारणात काही पक्क नसतं. आधी उद्धव ठाकरे मित्र होते. मग राज ठाकरे मित्र झाले. आता राज ठाकरे हे मित्र आहेत आणि उद्धव ठाकरे हे शत्रू नाहीतङ्घ, असं सूचक वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केलं. कुठलीही गोष्ट होणारच नाही, असं म्हणून चालणार नाही शरद पवार अतिशय चाणाक्ष आहेत. त्यांनी निश्चितपणे याचा अभ्यास केला असेल की, एवढं मोठं आम्ही तयार केलेलं वायुमंडळ एका मिनिटात पंक्चर झालं तर हे करणारी शक्ती कोण? त्यांच्या लक्षात आलं की, हे नेहमी राजकारण करणारी शक्ती नाही तर ही शक्ती नियमित राष्ट्रकारण करणारी शक्ती आहे. शेवटी प्रतिस्पर्ध्यांचं कौतुक करावं लागतं. त्या हिशोबाने त्यांनी कौतुक केलं असावं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## अकरा वर्षीय मुलीची केज पोलिसांनी केली सुटका

केज दि.९ (प्रतिनिधी): तालुक्यातून अपहरण करण्यात आलेली ११ वर्षीय मुलीची सुटका करण्यात आली असून अपहरण करणा-यालाही लातूर येथून ताब्यात घेण्यात आले आहे.आई-वडील ऊस तोडणीसाठी बाहेरगावी गेलेले असताना अल्पवयीन मुलगी, तिची बहीण व भाऊ हे आज्जी सोबत तालुक्यातील एका गावात आजोळी राहत होते. तर ११ वर्षीय वयाची मुलगी ही केज येथील एका शाळेत सहावीच्यावर्गात शिकत आहे. दि. ६ जानेवारी रोजी सल्परील वयीन मुलगी ही शौचास गेली असता तिला राजेश उत्तरेश्वर बारगजे (रा. टाकळी ता. केज) याने मोटारसायकल वरून तिचे अपहरण केले होते. अपहृत अल्पवयीन मुलीच्या आईने केज पोलिसात ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून त्याच्या विरुद्ध गु र नं. १०/२०२५ भा. न्या. सं. १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यावरून दि. ८ जानेवारी रोजी रात्री सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे आणि त्यांच्या पथकाने लातूर येथून अपहृत मुलीची सुटका केली असून तिचे अपहरण करणारा राजेश उत्तरेश्वर बारगजे याला ताब्यात घेतले आहे. दरम्यान, पोलीसांनी पाठलाग करताच मुलीला घेवून अपहरणकर्ता पळून जाऊ लागला. मात्र पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल दत्तात्रय बिक्कड, पोलीस जमादार राजू वंजारे, पोलीस नाईक शमीम पाशा यांनी आरोपींचा पाठलाग करत त्यास ताब्यात घेतले.

# शेतकरी कर्जमाफी फक्त निवडणुकीपूरतीच

# अजित पवारांच्या त्या वक्तव्यामुळे मोठा संभ्रम

### सरकार आल्यानंतर महायुतीच्या नेत्यांना कर्जमाफीचा विसर पडल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळाले. शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहीण योजना यांसह इतर अनेक योजना यंदाच्या निवडणुकीत गेम चेंजर ठरल्या. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या नेत्यांकडून मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या. यावेळी भाजप नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमचे सरकार आले तर राज्यातील शेतक-यांचे कर्जमाफ करु, अशी जाहीर घोषणा केली. पण आता सरकार आल्यानंतर महायुतीच्या नेत्यांना कर्जमाफीचा विसर पडल्याचे दिसत आहे. राज्याचे अर्थमंत्री आणि राष्ट्र वादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी शेतकरी कर्जमाफीबद्दल एक मोठे विधान केले आहे. यामुळे मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यातील दौंडमध्ये एका जाहीर कार्यक्रमात हजेरी लावली. या कार्यक्रमात त्यांनी जोरदार भाषण केले. यावेळी त्यांनी भाषणात आपण कधीच कर्जमाफीबद्दल बोललो नाही, असे म्हटले आहे. ङ्गमाझ्या भाषणात कधी तुम्ही कर्जमाफी ऐकलं का?असं विधान अजित पवारांनी केले. त्यामुळे आता शेतकरी कर्जमाफी मिळणार की नाही, या संभ्रमात अडकले आहेत. अजित पवार भाषणात काय म्हणाले? दौंडमध्ये केलेल्या भाषणात अजित पवारांनी एका कार्यकर्त्याला उद्देशून संवाद साधला. माझ्या भाषणात तुम्ही कधी कर्जमाफी ऐकलं का?.. मी एवढी भाषणं केलीःतुला एक माहिती आहे का? अंथरूण पाहून हातपाय पसरायचे असतात, राज्याचा गाडा आपल्याकडे आहे. आपण दोघं नंतर बसूः तुला मी माझी परिस्थिती सांगतोःमग तू मला तुझा सल्ला दे. मग त्याच्यातून काही जमत असेल तर आपण करू. आपण करायला कमी पडणार नाही असे अजित पवार म्हणाले.

### पुढच्या विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी कर्ज माफी करणार - हसन मुश्रीफ

दरम्यान अजित पवार आणि हसन मुश्रीफ यांनी शेतकरी कर्जमाफीबद्दल केलेल्या या विधानामुळे नवीन वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यातच यामुळे शेतकरी कर्जमाफी ही फक्त निवडणुकांच्या घोषणांसाठी मर्यादित होती का, असा प्रश्नही उपस्थितीत होत आहे. तसेच आता निवडून आल्यानंतर महायुती तसेच राष्ट्रवादीच्या नेत्यांना कर्जमाफीचा विसर पडला आहे का, असा प्रश्न होत आहे.

## भारत सरकार नोटरी पदी ॲड.रवींद्र गवारे यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई येथील प्रसिद्ध ज्येष्ठ वकील ॲड.रवींद्र लहुराव गवारे (गुळजकर) यांची भारत सरकार नोटरी पदी निवड करण्यात आली आहे.त्यांना ऑनलाईनद्वारे नोटरी आधिकारी निवड झाल्याचे प्रमाणपत्र देखील मिळाले आहे. केंद्र सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या यादीनुसार विविध ठिकाणचे नोटरी पदे जाहीर करण्यात आली असून यामध्ये अँड. रविंद्र लहुराव गवारे यांचे नाव प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर (दि.०९) रोजी ऑनलाईनद्वारे नोटरी आधिकारी म्हणुन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले असुन त्यामध्ये २५ वर्षा पासुन वकीली करणारे गेवराई न्यायालयातील प्रसिद्ध जेष्ट विधीज्ञ ॲड.रविंद्र लहुराव गवारे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे विविधस्तरातून अभिनंदन होत आहे.

## राजेंद्र मुंडे अमर रहे म्हणत सैनिक राजेंद्र मुंडे यांचे शासकिय इतमामात दहिफळ वडमाऊली येथे अंत्यसंस्कार

- केज (प्रतिनिधी)- भारतीय सैन्यदलात कार्यरत जवान राजेंद्र विक्रम मुंडे (वय ३५) यांचे नवी दिल्ली येथील आर.आर. सैनिक रुग्णालयात गुरुवारी पहाटे ४ वाजता निधन झाले. शुक्रवारी सकाळी शासकीय इतमामात त्यांच्या मुळगावी दहीफळ वडमाऊली येथे आल्यावर एका सजावट केलेल्या गाडीतून अंतीम यात्रा काढून राजेंद्र मुंडे अमर रहेच्या घोषणा देऊन शासकीय इतमामात अंतिम संस्काराच्या वेळी हवेत फायरकरुन अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शासकीय अधिकारी, राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांसह गावकरी व नातेवाईक उपस्थित होते. यावेळी अनेकांना आश्रू आवरता आले नाहीत.केज तालुक्यातील दहिफळ वड माऊली येथील भारतीय सैन्यदलात कार्यरत जवान राजेंद्र विक्रम मुंडे हे पंजाबमधील भटिंडा येथे कार्यरत



असताना एक वर्षापूर्वी मुंडे यांना ब्रेन ट्यूमरचा आजार जडल्याने त्यांच्यावर चंदीगड व नवी दिल्ली येथील सैनिक रुग्णालयात दोन शस्त्रक्रिया केल्या होत्या. दरम्यान, सैनिक रुग्णालयात उपचारा दरम्यान दि.९ जानेवारी गुरुवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. नवी दिल्ली येथून त्यांचे पार्थिव खास विमानाने शुक्रवारी पहाटे पुणे येथील लोहगाव विमानतळावर आणण्यात आले. व त्यानंतर सैन्यदलाच्या विशेष वाहनातून केज तालुक्यातील दहीफळ वाडमाउली येथे सकाळी आल्यानंतर राजेंद्र मुंडे यांचा पार्थिव फुलाने सजावट केलेल्या एका सजावट गाडीतून त्यांची अंतीम यात्रा काढण्यात आली. सैनिक राजेंद्र मुंडे अमर रहेच्या घोषणा देऊन शेवटी त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अधिका-यांनी वाहून शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांना मानवंदना देऊन हवेत फायर करण्यात आले. यावेळी शासकीय अधिकारी व राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांसह गावकरी व नातेवाईक उपस्थित होते. यावेळी अनेकांना आश्रू आवरता आले नाहीत. राजेंद्र मुंडे हे २०११ मध्ये सैन्यदलात भरती झाले होते. २०१७ साली त्यांचा विवाह सारुकवाडी येथील मुलीशी झाला होता. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, भाऊ, विवाहित बहीण, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

## ऋषिकेशच्या प्रकल्पाचे सीईओ मीनल करनवाल यांच्याकडून पाहणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड येथे ५२ व्या जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनात लोहा तालुक्यातील सुगांव संकुलातील किसान विद्यालय उमरा येथील विद्यार्थी ऋषिकेश पार्वती गणेश कदम या विद्यार्थ्यांने चौकातील होणारे वायू प्रदूषण यंत्रणा हा प्रकल्प सादर केला.प्रकल्पपाचे सादरीकरण अतिशय उत्तम रित्या केले या प्रकल्पचे निरीक्षण करताना नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल



करनवाल शिक्षण अधिकारी सलगर यांनी प्रकल्पाची पाहणी केली.ह्याच प्रकल्पासाठी तालुक्यातील विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक गटात ऋषिकेश पार्वती गणेश कदम या विद्यार्थ्यांनी चौकातील वायू प्रदूषण यंत्रणा हा प्रकल्प योग्य मांडणी व सादरीकरण करण्यात आल्याबद्दल त्याचा प्रकल्प द्वितीय क्रमांक आला होता.यावेळी साईबाबा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.मोरे ई.व्ही. किसान विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.पदमवार बी.जी.व मार्गदर्शक शिंदे ए.बी.हे उपस्थित होते.

# शिवछत्र परिवाराने क्रीडा क्षेत्राला न्याय दिला-शंकरराव देशमुख

## जयभवानी शिक्षण संकुलात खो -खो आणि बॅडमिंटन स्पर्धेचे शानदार उद्घाटन

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदारसंघाची एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांचा शिवछत्र परिवार कायम राजकारणासोबतच समाजकारण आणि क्रीडा क्षेत्रामध्ये सक्रिय आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या मुलांमध्ये क्रीडा गुणांना चालना देण्याचे काम या परिवाराने केलेले आहे रणवीर पंडित यांनी या क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्याची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेवराई तालुक्यातील विद्यार्थी



खेळाडू क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करिअर करुन या तालुक्याचे नाव मोठे करतील असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी व्यक्त केला. क्रीडा महोत्सवाच्या खो-खो आणि बॅडमिंटन स्पर्धे चे उद्घाटन करताना ते बोलत होते. शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यात होत असलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये आज पाचव्या दिवशी मुलांच्या खोखो स्पर्धेचे आणि बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, मतदार नोंदणी विभागाचे विधानसभा प्रभारी सुभाष कदम, विधानसभा समन्वयक विक्रम सानप, व्यापारी युनियनचे अध्यक्ष शरद खरात, ॲड. उद्धव रासकर, सरपंच विष्णूपंण घोंगडे, माजी सरपंच अंकुश गायकवाड, सरपंच गोपाळ शिंदे मोहनराव काकडे, सुदाम पवार, रामेश्वर गरड, नंदू गरड यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते खेळाडूंचे मैदानासी नाते जोडले--- रणवीर पंडित जयभवानी जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत गेल्या तीन वर्षापासून हा क्रीडा महोत्सव यशस्वीपणे होत आहे. महोत्सवामध्ये वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्यामुळे शाळेतील विद्यार्थी खेळाडू जिंकण्याची उर्मी ठेवून मैदानावर सराव करताना दिसून येत आहेत. विद्यार्थी खेळाडूंचे मैदानाशी नाते जोडले गेले आहे. यातूनच उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. शारदा स्पोर्ट्स अकॅडमी आणि जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असे क्रीडामहोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांनी यावेळी सांगितले.जयभवानी विद्यालयाच्या भव्य मैदानावर या खो-खो च्या स्पर्धा होत आहेत. बॅडमिंटन स्पर्धा इंडोर स्टेडियम मध्ये होत असून या स्पर्धेमध्ये संस्थेचे १८ संघातील विद्यार्थी खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासन अधिकारी प्रा.गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड प्राचार्य डॉ.सरकटे, पर्यवेक्षक हरिभाऊ हाकाळे यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक क्रीडा शिक्षक आणि विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार ११ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

### झटपट श्रीमंत नाद; लाखो गुंतवणूकदारांना गंडा

दादर येथील शिवाजी मंदिर परिसरात टोरेस कंपनीच्या नावाखाली उघड झालेल्या आर्थिक घोटाळ्याने सर्वसामान्य, मध्यमवर्गीय नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. दर आठवड्याला ११ टक्के व्याजदर परतावा देण्याचे आमिष दाखवून ङ्गटोरेसफनावाच्या कंपनीने ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून घेतली. आधी सोने, हिऱ्याचे दागिने विकण्यापासून सुरुवात केलेल्या या कंपनीने गुंतवणुकीच्या माध्यमातून बक्कळ पैसा उभा केला. सुरुवातीच्या काळात सांगितल्याप्रमाणे आठवड्याला व्याजदर परतावा दिला गेला. त्यातून हजारो गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. पण मागील आठवड्यात अचानक या कंपनीच्या सर्व शाखांना टाळे लागल्याचे बघून गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले. या शाखांच्या बाहेर हवालदिल ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. ङ्गटोरेसफच्या नावाखाली मुंबई, ठाणे व आसपासच्या भागात ज्या शाखा सुरू करण्यात आल्या होत्या, त्यातील जवळपास सव्वालाख ग्राहकांची फसवणूक झाल्याची बाब पोलीस तपासातून पुढे येत आहे. टोरेस कंपनीच्या नावावर ग्राहकांची फसवणूक करणारा फंडा हा काही नवा प्रकार नाही. मुंबईत दोन महिन्यांत पैसे दुप्पट करून देतो, असे सांगणाऱ्या शेरेकर सारख्या अनेक खासगी कंपनीचा वन टू फॉरचा प्रकार गेल्या १५ ते २० वर्षांत मुंबईकरांनी अनुभवला आहे. पण त्यातून काही शहाणपण घेताना कोणी दिसत नाही. म्हणूनच असे प्रकार घडत असावेत. टोरेस कंपनीने कसे गंडवले ते एकदा पाहू. २०२३ मध्ये ङ्गप्लॅटिनम हरेन प्रायव्हेट लिमिटेडफया कंपनीने ङ्गटोरेसफब्रँड अंतर्गत सुरुवात केली. दादरमध्ये ३० हजार चौरस फुटांचा भव्य आउटलेट सुरू केला आणि मुंबईत दादरसह ग्रँट रोड, नवी मुंबई, कल्याण आणि मीरा रोड या भागात शोरूम सुरू करण्यात आले. कंपनीने ग्राहकांना भुरळ घालण्यासाठी सेमिनार्स घेतले. त्यात सोने, चांदी आणि हिरे स्टोनवर गुंतवणूक केल्यास तुम्हाला दुप्पट रिटर्न मिळेल. एवढंच नाही, तर एका आठवड्याला पैसे मिळण्याचे वचनही देण्यात आले. गेल्या वर्षभरापासून मुंबईतील अनेक भागांत याच योजनेच्या माध्यमातून डिसेंबरपर्यंत कंपनीने नियमित पैसे ग्राहकांना परत दिले होते. टोरेस कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना अवघ्या ४ हजार रुपयांपासून गुंतवणूक करता येत होती. ही कंपनी रविवारी पैसे गुंतवल्यास सोमवार ते शुक्रवारदरम्यान त्याचा परतावा देत असे. सहा लाखांपर्यंतच्या गुंतवणुकीवर कंपनीकडून ६ टक्के व्याज देत होती. तर सहा लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना ११ टक्के व्याज मिळत होते. सुरुवातीच्या काळात टोरेस कंपनीने उच्चभ्रू इमारतीत घरे, गाड्या आणि दागिने असा आकर्षक परतावा काही ग्राहकांना दिला. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास बसला. मुंबईत गुंतवणुकीवर घसघशीत रिटर्न्स देणाऱ्या टोरेस कंपनीच्या बिझनेस मॉडेलची सातत्याने चर्चा होत होती. यानंतर अनेकांनी डोळे झाकून लाखो रुपये टोरेस कंपनीत गुंतवले. मात्र टोरेस कंपनीने आपला गाशा आता गुंडाळला आहे. एकट्या दादर शाखेतील गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यात सुमारे १३ कोटी ४८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. एकूण सगळ्या बंद शाखेतील ग्राहकांनी पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यास सुरू केली आहे. ङ्गटोरेस ज्वेलरीफ या नावाखाली आतापर्यंत तब्बल सव्वालाख लोकांची एक हजार कोटींची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकारात कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना अटक केली असली, तरी कंपनीच्या दोन संस्थापकांनी विदेशात पलायन केले. ते दोघे युक्रेनचे नागरिक आहेत. पैसे मिळणे सोडाच; परंतु आकर्षक व्याजाच्या आमिषापायी अनेक कुटुंबावर मोठं आर्थिक संकट उभे राहिले आहे. कंपनीवर विश्वास ठेवून दुप्पट रिटर्नच्या अपेक्षेने कुटुंबाचे दागिने गहाण ठेवून गुंतवणूक केली. पण आता दागिने गायब झाले, अशी एका गुंतवणूकदाराची प्रतिक्रिया आहे. तर दादर येथील भाजी विक्रेते प्रदीपकुमार वैश्य यांनी साडेचार कोटी रुपयांची गुंतवणूक या कंपनीत केली होती. भाजीच्या दुकानासमोरच टोरेसचे आलिशान कार्यालय होते. सुरुवातीला एक लाख रुपयाच्या गुंतवणुकीवर आठवड्यात व्याज मिळाल्यानंतर त्याने कुटुंबीयांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. अवघ्या सात महिन्यांत वैश्य यांनी सर्वाधिक साडेचार कोटी गुंतवले. त्यांच्या तक्रारीवरून शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. भविष्यात पोलीस आरोपींना पकडतील. काही महिन्यानंतर प्रकरण शांत झाल्यावर आरोपींना जामीन मिळेल. मात्र गुंतवणूकदारांना स्वतःच्या घामाची मूळ रक्कम पुन्हा मिळविण्यासाठी कोर्टाच्या आदेशाची प्रतीक्षा करावी लागणार आहे

## प्रकल्पांना विरोध नको, रोजगारावर बोला!



कोकणात उद्योग, प्रकल्प आले की सोबतच लक्ष्मीही येईल एवढं निश्चित! मात्र ते यायला हवे. कोकणात कोणताही प्रकल्प केवळ विरोधामुळे उभा राहू शकला नाही. कोकणातील तरुण रोजगारासाठी सिंधुदुर्ग जवळच्या गोवा राज्यात जातो आणि रायगड, रत्नागिरीमधला तरुण मुंबईत पोटापाण्यासाठी धडपडतोय. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग, सावंतवाडी, वेंगुर्ले, कुडाळ या तालुक्यातील तरुण गोवा राज्यात नोकरी करत आहे. गोवा राज्यातील खासगी बड्या बँकांमधून कोकणातील तरुणांचा मोठा भरणा आहे. कोकणातील ग्रामीण भागातील अनेक घरं बंद आहेत. त्याचं कारणही हेच आहे. दुसरं काहीही नाही. अशी ही विचित्र स्थिती आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्या. सत्ता स्थापनही झाली. राज्य कारभाराचा गाढाही सुरू झाला. सत्ताधारी काय करणार याकडेच जनतेचे अपेक्षेने डोळे लागून राहिले आहेत. विरोधक काय बोलतात, टीका कोणती करतात याकडे फारसे लक्ष देण्याची आता आवश्यकताही नाही. याचे कारण आतापर्यंत फक्त विरोध होत राहिला. यामुळे कोकणात रोजगाराच्या कोणत्याही संधी निर्माणच होऊ शकल्या नाहीत. परिणामी कोकणात कोणताही प्रकल्प आणला नाही, नव्हे तर प्रकल्पच येऊ दिला नाही. यामुळे साहजिकच कोकणात पदवी, इंजिनीअरिंग आदी क्षेत्रात पदवी घेतलेल्या तरुणांच्या बेकारीची संख्या कमालीची वाढली. कोकणात कोणताही प्रकल्प केवळ विरोधामुळे उभा राहू शकला नाही. कोकणातील तरुण रोजगारासाठी सिंधुदुर्ग जवळच्या गोवा राज्यात जातो आणि रायगड, रत्नागिरीमधला तरुण मुंबईत पोटापाण्यासाठी धडपडतोय. अशी ही विचित्र स्थिती आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग, सावंतवाडी, वेंगुर्ले, कुडाळ या तालुक्यातील तरुण गोवा राज्यात नोकरी करत आहेत. गोवा राज्यातील खासगी बड्या बँकांमधून कोकणातील तरुणांचा मोठा भरणा आहे. गोवा राज्यातील औषध कंपन्या, प्रिंटिंग प्रेस यामध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक सिंधुदुर्गातील तरुण कार्यरत आहेत. वृत्तपत्र क्षेत्रातील एका संपादक मित्राने सांगितले, सिंधुदुर्गातील प्रिंटिंग प्रेसमधल्या तरुणांनी ठरवले, तर अख्ख्या गोवा राज्यात एकाही वृत्तपत्राची छपाई होणार नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात तरुण या प्रिंटिंग प्रेसमध्ये कामाला आहेत. गोवा राज्यातील बँकांची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. सातार्डे ब्रिज शेजारी हजारो मोटारसायकल दिवसभर उभ्या असतात. त्या गाड्यांच्या संख्येवरून सहज लक्षात येऊ शकेल की, गोवा राज्यात आपल्याकडील किती हजार तरुण काम करीत आहेत. अनेक तरुण अनिच्छेने मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरात नोकरी, व्यवसायासाठी कार्यरत आहेत. कोकणातील ग्रामीण भागातील अनेक घरं बंद आहेत. त्याचं कारणही हेच आहे. दुसरे काहीही नाही. कोकणातील तरुणांना कोकणात रोजगार उपलब्ध झाला, तर बाहेर कुठेही जाण्याची त्या तरुणांची मानसिकताच नाही. यामुळे कोणत्याही स्थितीत कोकणात नव-नवीन प्रकल्प येण्याची आवश्यकता आहे. उद्योगांची उभारणी झाली पाहिजे. आज कोणताही प्रकल्प कोकणात येतो म्हटला तरीही त्याला विरोध हा ठरलेलाच आहे. विरोध करणाऱ्यांना राजकारण करायचे असते. त्यांना कोकणातील जनतेच भल-बुरं काही समजून घ्यायचं नसते. त्यामुळे विरोध करणारे हे करतच राहणार. विरोधक विचारी झाले नाहीत तरीही चालेल; परंतु कोणत्याही स्थितीत कोकणातील जनतेने विचारी होण्याची आवश्यकता आहे. सकारात्मक विचाराने कोकणात प्रकल्प यायला पाहिजेत. पर्यटन व्यवसायातून रोजगाराची निर्मिती होईलच; परंतु त्याचबरोबर कोकणात उद्योगही उभे राहिले पाहिजेत. लाख-दोन लाख तरुणांना रोजगार उपलब्ध होणारे प्रकल्प झाले पाहिजेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून हे घडले पाहिजे. पर्यटन व्यवसायातही एका मर्यादेपलीकडे तिथेही व्यवसायाला निश्चितच मर्यादा आहेत हा विचार करून कोकणात उद्योगांच्या उभारणीला प्राधान्यक्रम असला पाहिजे. आता जनतेनेच उद्योगांसाठी, प्रकल्पांसाठी आग्रही असण्याची आवश्यकता आहे. विरोधाचे काळे झेंडे आणखी किती वर्षे दाखवत राहणार. विरोधाच्या या काळ्या झेंड्यांनी एका तरुण पिढीचे भविष्यच काळवंडलय. याचा आता तरी विचार करा. कोकणातील गावातला तरुण कोकणात रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत म्हणून शहरांकडे जात आहे. यामुळे गावेच्या-गावे ओस पडली आहेत. गावातील घरातून अखंड वाडी-वस्तीत चार-दोन म्हातारी माणसं केवळ मरता येत नाहीत म्हणून जगत असणारी दिसतील. गावातील असंख्य घरातील वयोवृद्धांशी गावात बोलायला माणसं नाहीत. त्यात जवळचा नातेवाईक, स्नेही किंवा ओळखीचा कोणी दिसला तर त्याने आपल्याशी खूप बोलावं याच अपेक्षेने ते वयोवृद्ध दिसतात. घरातील एकटेपणा या वृद्धांना सतावतो. मुलगा, सून अमेरिकेला परदेशात त्याचा जरूर अभिमान त्यांच्या उरात असतो; परंतु आपला लेक आपल्यासोबत नाही. या खंतावलेल्या मनाने त्यांच्या डोळ्याच्या कडा कधीच्याच ओलावलेल्या असतात. डोळ्यातलं पाणी वार्धक्याने सुरकुतलेल्या चेहऱ्यावर कधी येत ते त्या थरथरणाऱ्यांना कळतही नाही असं हे सारं भीषण वास्तव आज कोकणात आहे. यामुळेच उद्योग, प्रकल्प आले की सोबतच लक्ष्मीही येईल एवढं निश्चित!

## लक्ष्मण महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने बीडमध्ये शनी जन्मोत्सवाची सांगता; भागवत कथा, कीर्तनासह झाले विविध धार्मिक कार्यक्रम

बीड प्रतिनिधी शनीच्या साडेतीन शक्तीपिठांपैकी अर्धपीठ असणाऱ्या श्री क्षेत्र शनी देवस्थान बीड येथे बंकटस्वामी मठाचे प्रमुख गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने दिनांक ०८ जानेवारी रोजी शनी जन्मोत्सव सोहळ्याची सांगता झाली. यावर्षी शनी जन्मोत्सवानिमित्त भागवत कथा, कीर्तन त्याचप्रमाणे इतर धार्मिक कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आलं होते. एक जानेवारीपासून शनी जन्मोत्सव सोहळ्यास सुरुवात झाली होती. त्यानिमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार यांची कीर्तने,संपन्न झाली. ह.भ.प.सचिन महाराज सपकाळ यांच्या अमृततुल्य वाणीतून भागवत कथा संपन्न झाली. पहाटे चार ते सहा या वेळेत काकडा, गाथा भजन, दुपारी भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, रात्री कीर्तन व शेवटी हरिजागर अशा रोजच्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. शेवटी ह.भ.प. गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे ,बंकटस्वामी संस्थान, नेकनूर यांचे काल्याचे किर्तन होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. त्यांनी भगवान श्रीकृष्णाचे चरित्र आपल्या वाणीतून कथन केले. शनी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त मंदिरात आलेली रोषणाई याचेही त्यांनी कौतुक केले. सर्व शनी भक्तांनी शनी मंदिराच्या विकासासाठी हातभार लावावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कीर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. यावर्षी जवळजवळ दहा हजारांपेक्षा भाविकांनी महाप्रसाद घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शनी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष धर्मभूषण रामनाथ खोड, प्रकाश कवठेकर, संतोष जाधव, अंकुश कदम, शरद चव्हाण, गणेश मस्के, डॉ.गणेश ढवळे, बालाजी मारगुडे, बाळासाहेब कदम, शंकर कुरुळे, योगेश मेखे, संतोष आघाव, हरिष जैन, सातपुते,भारत मुळूक, श्रीकृष्ण महाराज उबाळे, संतोष महाराज डोंगरे, त्र्यंबक महाराज मातकर, आदित्य पायगुडे, हरीश जैन यांच्यासह सर्व विश्वस्त मंडळ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यासह राज्य तसेच देशभरातून भाविक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्योगविषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करावेत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योग विभागाच्या १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण

राज्यात जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यासाठी ईज ऑफ डुइंग बिझनेसची प्रक्रिया आणखी उद्योगपूरक करावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील जागांचे वाटप करण्याची प्रक्रिया येत्या १०० दिवसात करावी. उद्योग विषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करण्याची गरज असून त्यासंदर्भात तातडीने आराखडा तयार करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आज राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या आराखड्यासंदर्भात उद्योग विभागाचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कामगार मंत्री आकाश फुंडकर, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, इंद्रनील नाईक उपस्थित होते. उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन यांनी १०० दिवसात उद्योग विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामासंदर्भात सादरीकरण केले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) सध्या ३ हजार ५०० एकर जमीन वाटपासाठी उपलब्ध असून नवीन १० हजार एक जमीन अधिग्रहणासाठी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ईज ऑफ डुइंग बिझनेस



अंतर्गत मैत्री पोर्टल व उद्योग आयुक्तालयाचे पोर्टलवर एआय चॅटबॉट सुविधा देण्यात येणार आहे. तसेच शून्य प्रलंबितता धोरण अवलंबून मैत्री पोर्टलवर आणखी ५० सेवांचा समावेश करण्याची प्रक्रिया येत्या १०० दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. उद्योग धोरण, इलेक्ट्रॉनिक धोरण, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, वस्त्रोद्योग धोरण व एमएसएमई धोरण या धोरणांमध्ये कालानुरुप बदल करण्याची आवश्यकता असून यासाठी मार्चपर्यंत प्रक्रिया सुरू करावी, असेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उद्योग व निर्यातीला चालना देण्यासाठी सर्व जिल्हानिहाय गुंतवणूक व निर्यात परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत दहा हजार नवउद्योजक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नवउद्योजक तयार करतानाच तरुणांना अप्रेंटीशिप मिळावी, यासाठी कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे - तक्रार निवारणासाठी कक्ष तयार करणार - दावोस गुंतवणूक परिषद २०२५ मध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यावर भर - गुंतवणूक प्रोत्साहन अनुदानाची रक्कम तातडीने वितरित करणार - परकीय गुंतवणूक आणण्यासाठी पावले उचलणार - ऑरिक सिटी, दिघी पोर्ट व बिडकीन औद्योगिक शहरांमधील कामे तातडीने पूर्ण करणार -जिल्ह्यांमध्ये उद्योग सेवा केंद्रांचे बळकटीकरणावर भर यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ११ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवार रोजी शिवाजी महाराज येवले यांचे कीर्तन



बीड । प्रतिनिधी विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील पाचव्या पुण्यतिथी पौष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. शिवाजी महाराज येवले हनुमान टेकडी नायगाव ता जि.बीड यांचे सोमवार दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी जवळा ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## नगरोउत्थान योजने अंतर्गत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते हनुमान मंदिर रस्ते व नालीच्या बांधकामाचे उद्घाटन संपन्न

केज/प्रतिनिधी नगरोउत्थान योजने अंतर्गत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जुन्या केज शहरातील मुख्य रस्ता हा हनुमान मंदिर पर्यंत रस्ते व नालीच्या कामाचे उद्घाटन जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौं.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न झाले आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौंकापासून हा रस्ता प्रभाग क्रमांक १२,१३,१४आणि १५ या प्रभागातील जुन्या केज शहरातील मुख्य रस्ता मानला जात आहे. या रस्त्याने शहरातील सर्व समाज बांधवांचे महत्वाचे सण-उत्सव साजरे करून मिरवणूक काढली जात आहे सदर रस्ता हा गत अनेक वर्षापासून खराब झालेला होता. या रस्त्याचे व नालीचे बांधकाम हे नगरोउत्थान योजनेअंतर्गत ७६ हजार कोटी रुपयांच्या उर्वरित बजेट मधून ॲप्रोच रोड करण्यात येत आहे असे माध्यमाशी बोलताना हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौं. सीताताई बनसोड यांनी सांगितले आहे. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौं. सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेवक खैसरभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, जनविकास परिवर्तन आघाडीचे युवा नेते लखन हजारे, नगरसेविका पती युनुसभाई शेख, मजर शेख, गफार बागवान, आसिफ इनामदार यांच्यासह जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व या भागातील नागरिक उपस्थित होते.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात ग्रंथवाचन, उत्स्फुर्त भाषण, काव्यवाचन, व्याख्यान, परिसंवाद , चर्चासत्र



केज / प्रतिनिधी स्वानंद सर्वजनिक वाचनालय, आनंदगाव ता. केज. जि. बीड येथे दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी ग्रंथवाचन, उत्स्पुर्त भाषण, काव्यवाचन, व्याख्यान, परिसंवाद, चर्चासत्र हे ङ्ग वाचन संकल्प महाराष्ट्रा चा अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव (बप्पा) गायकवाड हे होते.या विविध कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.शिवम गायकवाड, रोहन गायकवाड, स्वप्नील गायकवाड, कृष्णराजे गायकवाड, विक्रम गायकवाड, अथर्व गायकवाड, प्रथमेश गायकवाड, चांचासह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होते.वाचन कक्षात ग्रंथप्रदर्शनही झाली.तसेच सेवानिवृत्त ग्रामसेवक एस. पी. गायकुवाड, रापसाहेब जाधव, रंजीत पाटील, रामराजे गायकवाड, दत्तात्रय कदम, संजय सोनवणे, नारायण गायकवाड,आरुण गायकवाड, आनंद( भैय्या) गायकवाड यांचाही सहभाग होता.विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत ग्रंथवाचन, काव्य वाचन, उत्स्फुर्त भाषण, परिसंवाद, चर्चासत्र कार्यक्रमात भाग घेतला. तसेच विद्यार्थ्यांचेच थोडक्यात व्याख्याने झाली.अध्याक्षीय सम ारोप वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुगसंचलन, आभार प्रदर्शन आनंद( भेय्या) गायकवाड यांनी केले.

## मा. शंकरजी गायकर साहेब आणि डॉ. विश्वासराव आरोटे यांची महत्त्वपूर्ण भेट: गोमाता संरक्षण, महिला सन्मान आणि समाजसुधारणेवर विचारमंथन!

ब्राम्हणवाडा, प्रतिनिधी (अकोले तालुका): आज ब्राम्हणवाडा गावाने एक ऐतिहासिक क्षण अनुभवला. विश्व हिंदू परिषद केंद्रीय सह मंत्री आणि राष्ट्रीय प्रवक्ता माननीय श्री. शंकरजी गायकर साहेब आपल्या गावी ब्राम्हणवाडा येथे आले होते यावेळी त्यांनी महाराष्ट्र राज्य सरचिटणीस आणि दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याशी महत्त्वपूर्ण चर्चा केली.डॉ. विश्वासराव आरोटे यांना नुकताच ङ्गपत्रकार भूषण पुरस्कार २०२५ङ्ग प्रदान करण्यात आला होता. याबद्दल मा. शंकरजी गायकर साहेब यांनी त्यांचा सत्कार करत त्यांचे अभिनंदन केले. या भेटीमुळे समाजाच्या विकासासाठी पुढील दिशा आखण्यासाठी महत्त्वाचे विचारमंथन घडले.गोमातेच्या संवर्धनावर विशेष चर्चा,शंकरजी गायकर साहेबांनी गोमातेच्या म हत्त्वावर सखोल विचार मांडले. ते म्हणाले, ङ्गगोमाता ही केवळ आपली संस्कृतीच नव्हे, तर आपल्या कृषीप्रधान देशाचा आत्माही आहे. गोमातेचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. तिचे पालन-पोषण फक्त दुधासाठी न करता, संपूर्ण जबाबदारीने केले पाहिजे.गोमातेच्या



संरक्षणासाठी प्रयत्न,गायकर साहेबांनी त्यांच्या संघर्षाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, २०१५ मध्ये मोदी सरकारच्या काळात गोहत्या बंदीचा कायदा लागू झाला. यासाठी आम्ही अनेक आंदोलनं केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात नागपूर अधिवेशनात गोसेवा आयोग स्थापन करण्यासाठी आम्ही प्रखर आंदोलन केले.त्यांनी असेही नमूद केले की, गोमाते पुढे कोणतेही सरकार असो, आम्ही गोमातेच्या संरक्षणासाठी सदैव झटत राहू. हिंदुस्तान कृषीप्रधान देश आहे आणि गोमाता ही त्या देशाच्या भरभराटीचा आधार आहे. प्रत्येक शेतक-याने गावठी गायींचे पालन केले पाहिजे. गायींना जंगलात सोडून न देता, त्यांचे योग्य पालन करून शेतकरी आपले जीवन अधिक समृद्ध करू शकतो.हिंदू परंपरा आणि गोमातेचे स्थान,गायकर साहेबांनी हिंदू धर्मामध्ये गोमातेचे असलेले महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, ङ्गपूर्वीच्या काळात मुलीच्या लग्नात गोदान करण्याची प्रथा होती. याचा अर्थ गोम ातेच्या माध्यमातून मुलीला तिच्या आईच्या मायेचा अनुभव मिळावा, असा होता. गोमाता ही आपल्या कुटुंबाचा आणि संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. जन्म ापासून मृत्यूपर्यंत हिंदू धर्मात गोमातेचे स्थान अबाधित आहे.महिलांच्या सन्मानासाठी आवाहन,गायकर साहेबांनी महिला सन्मान आणि समानतेचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, आपल्या समाजात महिलांना माता-भगिनी म्हणून मानाचे स्थान मिळाले पाहिजे. विधवा, परित्यक्ता, सौभाग्यवती यामध्ये कोणताही भेदभाव करता कामा नये.त्यांनी एक महत्वाचे उदाहरण दिले की, मी एका कार्यक्रम ात हिंदू आणि मुस्लिम महिलांचे एकत्र पूजन केले होते. यामुळे समाजातील समरसता टिकवण्यासाठी मोठा संदेश जातो.स्त्री सन्मानासाठी प्रेरणा,त्यांनी राणी तारामती यांचे उदाहरण देत सांगितले की, ङ्गस्त्रिया आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ आहेत. त्यामुळे त्यांच्या सन्मानासाठी प्रत्येकाने जागरूक राहिले पाहिजे. सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महिलांना प्राधान्य दिले पाहिजे.भेटीचे परिणाम आणि चर्चा विषय,या भेटीदरम्यान गोमाता संरक्षण, कृषी सुधारणा, हिंदू संस्कृती, आणि समाजातील स्त्रियांच्या सन्म ानासाठी अनेक उपाययोजना सुचवण्यात आल्या. शंकरजी गायकर साहेबांनी गोमातेच्या कायद्याचे महत्त्व पटवून दिले आणि यासाठी सरकारवर कसा दबाव आणावा, यावर मार्गदर्शन केले.डॉ. विश्वासराव आरोटे यांनीही पत्रकारितेच्या माध्यम ातून समाज प्रबोधनासाठी योगदान देण्याचे वचन दिले. त्यांनी सांगितले, ङ्गगोमाता संरक्षण, समाज सुधारणा, आणि महिला सन्मान यांसाठी आपण नेहमी तत्पर राहू.ब्राम्हणवाडा गावात झालेली ही भेट सामाजिक, सांस्कृतिक, आणि धार्मिक एकात्मतेचा संदेश देणारी ठरली. गोमातेच्या संवर्धनासाठी, महिलांच्या सन्मानासाठी, आणि समाजाच्या विकासासाठी ही भेट प्रेरणादायी ठरली आहे.

## बीडमध्ये होणार सीनिअर क्रिकेटसाठी निवड चाचणी

प्रतिनिधी। बीड दि.१० : बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने सीनिअर वयोगटातील संघ निवडीसाठी शनिवारी (दि.११) दुपारी २ वाजता बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सीनियर वयोगटातील निमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीड जिल्हा संघ निवडीसाठी ही चाचणी होत असून पात्र खेळाडूंनी पूर्ण गणवेशात आधार कार्ड, जन्मप्रमाणपत्राच्या दाखला व प्रवेश शुल्कासह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांच्यावतीने करण्यात आले आहे.न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात आपण सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत. कोश्यारी यांनी घटनेला धरून निर्णय घेतला नाही हा एकच मुद्दा आम्ही कोर्टासमोर मांडला होता. मात्र राजकीय सूडबुद्धीने हा निर्णय झाला नाही असं माझं ठाम मत आहे. मात्र या निर्णया विरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात हे जाणार हे नक्की. अंबादास दानवे म्हणाले, याचिका फेटाळली याची काही अडचण नाही. मात्र, राज्यपालांनी आम्ही दिलेली यादी का पेंडिग का ठेवली होती? हा मुद्दा आहे.. तेलंगणाच्या न्यायालयाने याबाबत एक निर्णय दिलेला आहे. आधीच्या सरकारने दिलेली यादी नंतरच्या सरकारने बदलली होती. त्यानंतर उच्च न्यायालयात गेल्यानंतर अगोदरच्या सरकारने दिलेली यादी कायम ठेवली होती. त्यामुळे याबाबत विचार करु
०००

## आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता ...ॲड. शशिकांत सावंत

जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी दिनांक ८/०१/२०२५ रोजी सत्र केस क्रमांक ८८/ २०२३ मध्ये महत्वपूर्ण निकाल देऊन सबळ पुराव्या अभावी आर-ोपीचा बचाव ग्राह्य धरून सर्व आरोपींची सदर केस मधून निर्दोष मुक्तता केलेली आहे.. घटनेची हकीगत आशि की दिनांक ११ /१२ /२०२० रोजी फिर्यादी दादाराव भगवान महानोर यांनी चकलांबा पोलीस



ठाणे येथे तक्रार दाखल केली की त्यांच्या मुलीचा विवाह आरोपी क्रमांक एक नागेश नारायण थोरात यांच्याशी दिनांक १२/०७/२०२० रोजी करून दिला होता व सदर लग्न झाल्यानंतर आरोपी क्रमांक एक ते सात यांनी लग्नात राहिलेल्या हुंड्याची मागणी केली व सततच्या हुंड्याच्या मागणीच्या जाचाला कंटाळून फिर्यादीच्या म ुलीने दिनांक १०/१२/२०२० रोजी शेंबडे शेकटा तालुका गेवराई जिल्हा बीड येथील अशोक राव साहेब धोंगडे यांच्या विहिरीमध्ये उडी मारून आत्महत्या केली सदर आत्महत्यास आरोपी क्रमांक १ते७ हे जबाबदार असून आरोपींच्या जाचाला कंटाळून फिर्याद-ीच्या मुलीने आत्महत्या केल्याची फिर्याद गु.र.न.३४७/२०२०

**सदर प्रकरणाकडे मादळमोही सर्कल आणि परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून होते, सदर प्रकरणांमध्ये एकही साक्षीदार फितूर नसताना माननीय न्यायालयाने बचाव पक्षाचा बचाव ग्राह्य धरून आरोपींची सदर प्रकरणांमधून निर्दोष मुक्तता केलेली आहे...**

कलम ३०४(ब)३०६,४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ अन्वय हुंडाबळी, व आत्महत्या करणेस प्रवत्त करण्याचा गुन्हा दाखल झाला होता सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मा.न्यायालया मध्ये एकूण १७ साक्षीदारांचे जबाब नोंदवून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, त्या अनुषंगाने सरकारी पक्षाच्या वतीने एकूण आठ सा-क्षीदार यांचे जबाब नोंदवण्यात आले, आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला बचाव व साक्षीदारांच्या जबाबा मध्ये आलेली विसंगती पाहून मा. न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने अव. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली त्यांना अव. मुकुंद लोणकर,अव. अभिषेक बहिर,अव. डाके,अव. भांडवले,अव. प्रदीप दराडे यांनी सहकार्य केले

## विजेच्या शॉर्टसर्किटमुळे शेतक-याच्या उसाचे नुकसान



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील गट नंबर ७९४ मधील शेतकरी सुभाष जगदेवराव सिरसाट यांच्या शेतामधील एक एकर ऊस विधुत वाहिनीच्या शॉर्टसर्किटीमुळे लागलेल्या आगीत जळाला असून शेतक-याच्या उसाचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सविस्तर वृत्त असे की उमरा येथील गट क्रमांक ७९४ या क्षेत्रातील शेतकरी सुभाष जगदेवराव सिरसाट यांच्या शेतातील वीज प्रवाहाच्या शॉर्ट सर्किटमुळे अचानक लागलेल्या आगीमध्ये त्यांच्या उसाचे प्रचंड नुकसान झाले असून या आगीमध्ये शेतक-यांच्या उसाचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले असून त्यासंबंधी ३३ केव्ही उपकेंद्र कापसी सहाय्यक अभियंता यांना संबंधित शेतक-यांच्या वतीने निवेदन देण्यात आले असून यावर लवकरच पंचनामा करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन यावेळी महावितरण कडून देण्यात आले. माझ्या झालेल्या उसाच्या नुकसानीचे पंचनामा करून महावितरण व कृषी विभागाने शासनाकडून मदत मिळवून देण्याची विनंती शेतकरी सुभाष जगदेवराव सिरसाट यांनी केली आहे.

## कत्तलखान्याकडे जात असलेला टेम्पो पकडला ,केज, नेकनुर पोलीसा संयुक्त कारवाई

केज/ प्रतिनिधी:- काल दिनांक ०९/०१/२०२५ रोजी सायंकाळी १७.३० वा. सुमारास गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, केज ते बीड जाणारे राष्ट्रीय महामार्गावर एक आयशर टेंपो जिचा पार्सींग क्र.चक-२५-ण-०३९४ मध्ये जर्सी गाय, देशी गाय, म्हैस, बैल यांची निर्दयीपणे कोंबुन बीडच्या दिशेने वाहतुक करत जात आहे. अशी माहीती मिळाल्याने आम्ही तात्काळ पोलीस ठाणे केज येथील अंमलदार यांना बातमीची खात्री करुन सदर वाहणावर कायदेशिर कार्यवाही करणेसाठी पाठवुन पोलीस ठाणे नेकनुर येथे संपर्क करुन तेथील अधिकारी व अंमलदार यांना सदरचे आयशर वाहण थांबवणे बाबत कळविले. १८.३० वा. सुमारास केज ते बीड जाणारे रोडवर बरड फाटा येथे पोलीस ठाणे केज व पोलीस ठाणे नेकनूर येथील पथकाने सदरचे आयशर टेंपो थांबवुन पाहणी केली असता सदर आयशर टेंपो मध्ये ०५



जर्सी गायी, ०१ जर्सी गायीचे वासरु, ०१ म्हैस, ०१ हल्या, ०३ खिल्लारी बैल, ०१ देशी गाय, असे एकुण आयशर टेंपोसह ९,४२,०००/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला असुन सचिन रामकिसन वाघमारे, पोलीस अंमलदार ब.नं. १७३० यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज येथे गुरनं. १६/२०२५ कलम ११ (१) (ऊ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सह कलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सह कलम ८३,१३०,१७७ महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम प्रमाणे एकुण ०७ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस ठाणे केज येथील उमेश बाबुराव आघाव पोलीस हवालदार ब.नं. ४२९ हे करत आहेत.सदर कार्यवाही मा. श्री. नवनीत कॉवत, पोलीस अधिक्षक सो बीड, मा. श्रीमती चेतना तिडके मॅडम, अपर पोलीस अधिक्षक, अंबाजोगाई, मा.श्री. कमलेश मिना, सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभाग केज यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वैभव पाटील, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज, श्री. पवनसिंग जंघाळे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे नेकनुर, ग्रे. पोलीस उपनिरीक्षक, मुकुंद शामराव ढाकणे, पोना/१८९७ राऊत, पोशि/४४४ ढाकणे, पोलीस ठाणे नेकनूर, पोशि/१७३० वाघमारे, पोलीस ठाणे केज यांचे पथकाने केलेली आहे.

# मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येनंतर राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. गेल्या काही दिवसांपासून संतोष देशमुख यांना न्याय मिळावा या मागणीसाठी सातत्याने मोर्चे काढले जात आहेत. या मोर्चाला सर्वपक्षीय नेते हजेरी लावत आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे देखील संतोष देशमुख यांच्या मारेक-यांना अटक करावी अशी मागणी करत आहेत. त्यातच आता मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज जालन्यात सकल मराठा समाज आणि मराठा संघटनांकडून जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला. या मोर्चामध्ये देशम ुख कुटुंबीय, मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील, दीपक केदार यांच्यासह समाज बांधव सहभागी झाले होते. परंतु या मोर्चात मनोज जरांगे यांचे भाषण झाले नाही. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खराब आहे. त्यामुळे त्यांनी मोर्चाच्या आयोजकाना मी बोलणार नाही. माझी तब्येत खालावली आहे, असे सांगितले होते. त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांना उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलम ध्ये दाखल करण्यात आले. उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलम ध्ये दाखल आज जालन्यात मराठा समाजाचा आक्रोश मोर्चा होता. या मोर्च्यात मनोज जरांगे पाटील हे तब्येत खराब असतानाही चालले. त्यांना थकवा जाणवत असल्याने त्यांनी भाषण दिले नाही. यानंतर आता त्यांना उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी गॅलेक्सी हॉस्पिटलचे



डॉक्टर प्रदीप चावरे यांनी जरांगे पाटील रक्तदाब कमी आहे. बॅक पेन जास्त आहे त्यामुळे त्यांचे सिटी स्कॅन करण्यात येणार आहे. आता रिपोर्ट आल्यावर त्यांच्यावर पुढील रिपोर्ट आल्यावर उपचार केले जाणार आहेत.कंबरदुखीमुळे हैराणसध्या मनोज जरांगे पाटील यांची कंबर दुखत आहे. त्यांना पाय-या चढायला उतरायला त्रास होत आहे. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असले तरी त्यांनी उद्या धाराशिवमध्ये मोर्चाला जाण्याचा निर्णय घेतला आहे, असे म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ११ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# पाटोद्यात धनंजय मुंडे समर्थक आक्रम

## तर पाटोदा पोलीस ठाण्यात मोठी घोषणाबाजी..



बीड: पाटोदा पोलीस स्टेशनमध्ये मंत्री धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी आक्रमक पवित्रा घेत सकाळपासून ठिय्या आंदोलन केला आहे याम ध्ये पोलीस स्टेशनमध्ये मोठ्या घोषणाबाजी करण्यात आले आहे यामध्ये मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी यावेळेस केली आहे. तर त्याचबरोबर सुरेश धस अंजली दमानिया यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात यावा ही मागणी या कार्यकर्त्यांनी केली आहे गुन्हा दाखल होईपर्यंत हा ठिय्या मागे घेतला जाणार नाही असाही पवित्र या कार्यकर्त्यांनी घेतला यामध्ये तीन तासाच्या नंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे यामध्ये यादी पोलीस ठाण्यात गटाचे समर्थक देखील अगोदर याच पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी गेले होते मात्र हे समर्थक बाहेर पडतात धनंजय मुंडे यांच्या सम र्थकांनी सकाळी दहा वाजल्यापासून पोलीस ठाण्यासमोर हे आंदोलन सुरू केलं यामध्ये मोठ्या घोषणाबाजी करण्यात आल्या त्याचबरोबर त्या घोषणाबाजी मध्ये काही वेळासाठी तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचे देखील पाहायला मिळाले कारण दोन्हीही समर्थक आमने-सामने जरी आले नाही तरी घोषणाबाजी मूळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं आता या मागणीमुळे आणि धनंजय मुंडे समर्थक यांनी केलेल्या मागणी ही पोलिसांनी ऐकत आता गुन्हा दाखल केला आहे

# उपमुख्यमंत्री झाल्यावर एकनाथ शिंदे यांच्या चेह-यावर हास्य गेले कुठे ?

## उपमुख्यमंत्री झाल्यावर एकनाथ शिंदे यांच्या चेह-यावर हास्य नाही, त्यामुळे ते नाराज आहेत,



विधानसभा निवडणुकीत म हायुतीला चांगले यश मिळाले. निवडमुकीत १३२ जागा भाजपला मिळाल्या. त्यामुळे भारतीय जनता पक्षाचा मुख्यमंत्री न करणे हे जनतेला आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवडले नसते. त्यावेळी माध्यमांमध्ये वेगवेगळ्या चर्चा होत होत्या. परंतु त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी लगेच सांगितले होते की, भाजप हाच मोठा पक्ष आहे. त्यामुळे भाजपचा मुख्यमंत्री झाला पाहिजे. म ाझी काही हरकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत सांगितले. मग एकनाथ शिंदे यांच्या चेह-यावरील हास्य गेले कुठे? त्याचेही उत्तर फडणवीस यांनी दिले.एकनाथ शिंदे यांना सांगितले मुख्यमंत्री झाल्यानंतर उपमुख्यमंत्री व्हावे की नाही? हा मोठा प्रश्न एकनाथ शिंदे यांच्यासमोर होता. त्यावेळी ते निर्णय घेऊ शकत नव्हते. त्यामुळे माध्यमांमध्ये बातम्या सुरु झाल्या. त्यावेळी मी त्यांच्याशी चर्चा केली. माझा अनुभव सांगितला. त्यांना सांगितलं की, तुम्हाला पक्ष चालवायचा आहे.

फुट पडल्यानंतर शिवसेना नवीन पक्ष आहे. या परिस्थितीत सत्तेच्या बाहेर राहून पक्ष चालवने अवघड जाईल. त्यामुळे तुम्ही सरकारमध्ये आले तर पक्षासाठी ते फायद्याचे असणार आहे. त्यांना सरकारम ध्ये येण्याचे महत्व पटवून दिले. अखेर त्यांनी ते मान्य झाले. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले.

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण; खासदार बजरंग सोनवणेंच्या पाठपुराव्याने मानव अधिकार आयोगात गुन्हा दाखल

**बीड। प्रतिनिधी मस्सोजागचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून आणि त्यांच्या देहाची केलेली विटंबना माणूसकीला काळीमा फासणारी घटना असून या प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकारी आयोगाने स्वतंत्रपणे चौकशी करावी, अशी मागणी केली होती. या प्रकरणात आयोगाने गुन्हा दाखल करून घेतला असून आता आयोगही स्वतंत्र चौकशी करणार आहे. ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे समजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा संतोष देशमुख यांचा जीव वाचावा, यासाठी खासदार सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क केला. दरम्यान, त्यांनी फोन घेणे टाळले. शिवाय केज पोलीसांनी देखील हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. या कालावधीत संतोष देशमुख यांचा मानसिक आणि शारीरिक छळ करुन हत्या झाली. संतोष देशमुख यांना इतक्या वाईट पध्दतीने मारहाण केली की शरीरावर एक इंच देखील जागा शिल्लक नव्हती. शिवाय शवाची विटंबना देखील करण्यात आली. इतक्या अमानुष पध्दतीने मारहाण झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडालेली आहे. या प्रकरणी ३ जानेवारी रोजी बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली येथे आयुक्तांची भेट घेऊन मस्साजोग येथील घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. संतोष देशमुख कुटुंबियांना मदत मिळऊन देणे बाबत आयोगाला विनंती केली. सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अत्यंत अमानवी आहे. यात मानव अधिकाराचे उल्लंघन झाले असल्यामुळे या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घ्यावी, अशी आग्रहाची विनंती केली होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने खासदारांची विनंती मान्य करुन मस्साजोग प्रकरणात गुन्हा क्र.३३/ १३/५/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करुन घेतला आहे. आता या गुन्ह्यामधील तपास, पोलिस आणि न्यायव्यवस्था यावर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचे सुद्धा लक्ष असेल. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग जिल्ह्यामध्ये तातडीने टीम पाठवून कारवाई करणार आहे. शिवाय या संपूर्ण घटनेचा अहवाल मागवणार असून ही टीम दिल्ली येथील असेल. घटनेच्या वेळी अथवा तपासामधे पोलिसांचे दुर्लक्ष झाले असल्यास राष्ट्रीय मानवाधिकार आयोग तसा अहवाल देते व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला याबाबत कारवाई करण्याचे अधिकार आहेत. आयोगाला न्यायिक व अर्धन्यायिक अधिकार आहेत**

# चाचा नेहरु जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांच्या स्पर्धाचे मन्सुरी अन्सार निसार यांच्या हस्ते उदघाटन





बीड । प्रतिनिधी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय बीडच्या वतीने आयोजित चाचा नेहरु जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांच्या स्पर्धाचे उदघाटन जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद व जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांच्या हस्ते शुक्रवारी दि.१० जानेवारी रोजी करण्यात आले. चाचा नेहरू जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आज जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद व जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विनोद भोसले संरक्षण अधिकारी ,तालुका संरक्षण अधिकारी उकरे पाटील, पी ओ कांबळे,लहु राऊत, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर चौगुले शेटीबा व क्रीडा शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वक्फ बोर्डाच्या जमिनीसाठी नियुक्त केलेल्या एसआयटीचे काय?




बीड। प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी देवस्थानच्या जमिनी भुमाफियांनी गिळंकृत केल्याचे प्रकार उघडकीस आले होते. अनेक ठिकाणी गुन्हे दाखल होवून बेकायदेशीरपणे लावलेली नावे वगळण्याची कारवाई झाल्यानंतर जिल्ह्यातील वक्फ मंडळाच्या जमिनी संदर्भात एसआयटी चौकशी लावण्यात आली होती परंतू या एसआयटी चौकशीचे काय झाले याचा मेळ कोणालाच लागलेला नाही. मागील एक दोन वर्षाच्या काळामध्ये बीड जिल्ह्यातील देवस्थानच्या जमिनी भुमाफियांनी गिळंकृत केल्या होत्या. अनेक देवस्थानच्या जमिनीवर सरकारी अधिकाऱ्यांशी संगनमत करून देवस्थानच्या ऐवजी स्वतःची नावे लावण्यात आले होते. बीडमध्ये वक्फ मंडळाच्या जमिनीवरील बेकायदेशीर नावांची नोंद उजेडात आल्यानंतर प्रकरण चांगलेच गाजले. अनेक ठिकाणच्या मोक्याच्या जागा वक्फ मंडळाने कारवाई करून भुमाफियांच्या घशातून काढल्या, गुन्हे दाखल झाले. याच नंतर सरकारने वक्फ मंडळाच्या जमिनी संदर्भात एसआयटी चौकशी लावली होती. त्या चौकशी समितीचे प्रमुख तत्कालिन डिवाएसपी होते. परंतू आज त्या एसआयटीचे काय झाले, चौकशीतून काय पुढे आले? हे गुलदस्त्यातच आहे. त्यामुळे अनेकांनी एसआयटीच्या त्या चौकशी संदर्भात वेगवेगळे प्रश्न उपस्थिती करणे सुरू केले आहे

# धनगर समजाचा राज्यस्तरीय वधु-वर मेळावा



बीड प्रतिनिधी : राजे मल्हाराव होळकर सामाजिक प्रतिष्ठाण यांनी धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर मेळाव्याचे आयोजन १६ मार्च २०२५ रोजी ११. वा. भगवान प्रतिष्ठाण बीड येथे करण्यात आलेले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात पालकांना पाल्यांचे विवाह जुळविणे दुरापास्त होत आहे. यामुळे आपल्या पाल्यांना योग्य जोडीदार मिळणे कठीण होत आहे. यासाठी मुलां-मुलींला योग्य जोडीदार मिळण्यासाठी पालकांनी आपल्या डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक व अन्य क्षेत्रातील नोकर व गरजु मुलां-मुलींचा बायोडाटा दि.२५/०२/२०२५ पर्यंत अंकुशराव येळे ९८९०९०७२६१, प्रा.भगवान माने ७०२००१४१४६, ॲड. राजु शिंदे ९४२२७०२८४३, प्रा.राजेंद्र गाडेकर ७०२०९७७१००, प्रा.भास्कर चादर ९४२०३८९०१४, आण्णासाहेब मतकर ७७९८०९०८१६, लासुने सर ९८६०२२५३३८, धवणसर, विशाल देवकते ९८९०६३६३९५, निर्मल महाराज ९०४९५९३२५२,या नंबरवर व्हॉटॲपद्वारे पाठवावे असे आवाहन राजे मल्हाराव होळकर सामजिक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रा.भगवान माने यांनी केले आहे.

# गरिबांची लेकरं शिकून मोठी झाली याचा मला आनंद-शिवाजीराव पंडित

गेवराई दि.१०(प्रतिनिधी) गरिब आणि सर्वसामान्यांची लेकरं शिकावी, मोठी व्हावी, मोठ्या पदावर जावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून मी गेवराई तालुक्यात शिक्षणाचे जाळे गुंफले. आज जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचा वटवृक्ष झाला आहे. मराठी आणि इंग्रजी शाळांच्या माध्यमातून माझ्या तालुक्यातील सामान्यांची लेकरं डॉक्टर इंजिनियर झाली याचा मला मनस्वी आनंद आहे. माझा हेतू साध्य झाला आहे. शिव शारदा पब्लिक स्कूलच्या माध्यमातून सामान्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळाल्यामुळे हे यश पदरी पडले असे भावोद्गार जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित यांनी काढले. शिवाजीनगर गढी येथील शिवशारदा पब्लिक स्कूलच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गेवराई तालुक्यातील शिवाजीनगर येथील शिवशारदा पब्लिक स्कूलचा २४ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक



शिवाजीराव पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक जगन्नाथ शिंदे, बाबुराव काकडे, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते प्रारंभी शिवाजीराव पंडित यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना शिवाजीराव पंडित पुढे म्हणाले की केंद्र सरकारचे नवोदय विद्यालय गढी येथे सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि ग्रामीण भागातील लेकरांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटला. श्रीमंताची लेकरं कुठेही जाऊन शिकू शकतात पण गरिबांच्या लेकरांचे काय ? या प्रश्नाची उकल करताना मी गेवराई तालुक्यात जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थांची स्थापना केली. आज या संस्थेचा मोठा वटवृक्ष झाला आहे. या संस्थेतून सामान्यांची लेकरं शिकून मोठी झाली. डॉक्टर इंजिनियर आणि प्रशासनात गेली हे पाहताना मन आनंदाने भरून गेले आहे. तालुक्यातील जनतेने शिवछत्र परिवारावर कायम प्रेम केले त्यामुळे शिवछत्र परिवाराला भरभरून मिळाले आहे असेही ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थांचा मार्च पास्ट घेण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.आर्या नरसाळे, सिद्धी कुटे, सृष्टी चव्हाण यांनी केले. यावेळी जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी प्रा गोगुले, अनंत डावकर, मुख्याध्यापक राजेंद्र जगदाळे, वसंत राठोड, किशोर पंडित, रणजित सानप, अशोक तौर, सय्यद युनूस, लक्ष्मण काळे, किशोर पंडित, भक्तराज पवळ, शिवाजी पाटोळे, पवार सर यांच्यासह शिवशारदा पब्लिक स्कूलचे सुनील चाळक, इरफान शेख, अलेन सर, विजय कोकाटे, बेलार्मिन सर, अरोमल सर, संजय खंदारे, विनोद देशपांडे, ज्ञानेश्वर धापसे, श्रीमती पंडित यांच्यासह सर्व विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RA-

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com